CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २८३ वा | मंगळवार दि. ८ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### उद्धव ठाकरेंनी दर्शवली राज ठाकरेंना फोन करण्याची तयारी



**मुंबई ।** शिवसेना पक्षप्रमुख (ठाकरे) तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना फोन करण्याची तयारी दर्शवली आहे. उद्धव यांनी खासगीत बोलताना यासंबंधीचे विधान केले आहे. त्यांच्या फोनला राज ठाकरेंनी सकारात्मक प्रतिसाद दिला, तर भविष्यात ही फोनाफोनी वाढून ठाकरे बंधू एकत्र येण्याचा मार्ग सुलभ होऊ शकतो. मनसेने २०१७ मध्ये शिवसेनेसोबत युती करण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यावेळी त्यांनी फोन उचलला नव्हता, अशी आठवणही देशपांडे यांनी यावेळी करून दिली.

## न्यूज कॉलम

### क्षुल्लक कारणावरून तरुणाला मारहाण

**धुळे ।** क्षुल्लक कारणावरुन वाद घालत मोहम्मद असद अख्तर हुसेन (वय २६, रा. हाजीनगर वडजाई रोड, धुळे) या तरुणाला दोन जणांनी अडवित शिवीगाळ केली. यातून मारहाण केल्याची घटना बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलिसात गुन्हा दाखल झाला असून दोघांचा शोध सुरु आहे.

### सोलर मोटार पंप चोरट्याने लांबविली

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील मेथी शिवारातील विहिरीत १ लाख रुपये किंमतीचा सोलर मोटार पंप लावण्यात आला होता. कोणीही नसल्याची संधी साधून चोरट्याने हा पंप लंपास केला. सर्वत्र शोध घेण्यात आला. पंप न मिळाल्याने न्हानभाऊ माळी यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला.

# पत्रकारास शिवीगाळ केल्याप्रकरणी आ. किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

## जिल्हा पत्रकार संघाचे महसूल प्रशासनासह पोलीस अधीक्षकांना निवेदन

**धुळे । प्रतिनिधी**





पत्रकार संदीप महाजन यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याप्रकरणी पाचोरा तालुक्याचे आ. किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांना निवेदन देवून करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हा लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा वारसदार मानला जातो. लोकशाही व्यवस्था सुदृढ ठेवण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची ठरत असते. पत्रकार समाजाचा आरसा असतो. जागरुक पहारेकरी असतो. चुकीच्या व समाजव्यवस्थेला घातक ठरणार्या बाबी प्रसारमाध्यमे उघडकीस आणतात. एक प्रकारे पत्रकार हा समाजव्यवस्थेत जागल्याचे काम करीत असतो. म्हणून प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तभ म्हटले जाते. या चौथ्या स्तंभाचा वारसदार असलेले पत्रकार संदीप महाजन यांना पाचोरा तालुक्याचे आमदार किशोर पाटील यांनी अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. लोकप्रतिनिधीने पत्रकाराशी असे वागणे हे लोकशाहीचा व माध्यमांचा अपमान करणारे आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार सघातर्फे याप्रकरणी आ. किशोर पाटील यांचा तीव्र निषेध करीत आ. किशोर पाटील यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रविंद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलींद बैसाणे, विद्यमान अध्यक्ष विशाल ठाकूर, उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष अतुल पाटील, प्रांतिक प्रतिनिधी तुषार बाफना, कार्यकारिणी सदस्य प्रा. मोहन मोरे, प्रकाश शिरसाठ, पवन मराठे, डॉ. श्रीकृष्ण बेडसे, जॉनी पवार, देवेंद्र पाटील, आकाश सोनवणे, सिध्दार्थ मोरे, अजिंक्य देवरे, पुरुषोत्तम गरुड, जमील शाह, सुनील चौधरी, दिपक शिंदे, सुनील बैसाणे, किशोर पाटील, नागिंद मोरे, मनोहर सोलंकी, गणेश पवार, सुनील निकम इत्यादी पत्रकारांच्या सह्या आहेत.

# आदित्य ठाकरेंच्या टोल बंद मागणीत मनसेची उडी

### दोन नाहीतर पाचही एन्ट्री पॉईंट टोल बंद करा

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील पश्चिम आणि पूर्व द्रुतगतीमार्गावरचे टोल बंद करण्याची मागणी केल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उडी घेतली आहे. मुंबईतील फक्त दोनच नाही तर पाचही एन्ट्री पॉईंटवरील टोल माफ करावे अशी मागणी मनसेचे प्रवक्ते संजय शिरोडकर यांनी केली आहे. या टोलनाक्यावरील वाहतूक कोंडीमुळे इंधन आणि वेळेचा अपव्यय होत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईत प्रवेश करण्यासाठी अथवा बाहेर पडताना पाच एन्ट्री पॉईंट आहेत. या पाच एन्ट्री पॉईंटवर टोल माफी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मनसे प्रवक्ते संजय शिरोडकर यांनी म्हटले की, नितीन गडकरी हे १९९५ मध्ये सत्तेवर आलेल्या युती सरकारच्या काळात आलेल्या सरकारमध्ये राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात ५५ उड्डाणपूले मुंबईत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. उड्डाणपूलांचा बांधकाम खर्च काढण्यासाठी मुंबईतील एन्ट्री पॉईंटवरून टोल वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही टोल वसुली २००२ मध्ये सुरू करण्यात आली. सध्या दहिसर आणि आनंद नगर येथील टोलनाके बंद करा अशी मागणी होत आहे. मुंबई पश्चिम - पूर्व द्रुतगतीमार्गावरचे टोल बंद करण्याची मागणी शिवसेना नेते युवा सेना अध्यक्ष आमदार आदित्य ठाकरे यांनी केली आहे. मुंबईतील रस्त्याची दुरुस्ती आणि देखभाल मुंबई पालिकेकडे, मग टोलचे पैसे एमएसआरडीसी कडे का, असा सवाल शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

# नाशिक स्मार्ट सिटीला मिळाला ‘इकोनॉमिक्स टाईम्स गर्व्हमेंट डिजिटेक’ पुरस्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

इकोनॉमिक्स टाईम्स गर्व्हमेंट डिजिटेकने हॉटेल ग्रँड हयात गोवा येथे दि. ५ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या चौथ्या डिजिटेक कॉन्क्लेव्ह कार्यक्रमामध्ये नाशिक महापालिकेच्या नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडला देशात द्वितीय क्रमांक मिळाला आहे. ‘महानगरपालिकेच्या शाळांचे डिजिटल सोल्युशन्स असलेल्या स्मार्ट शाळांमध्ये रूपांतर’ या प्रकारात रौप्य पदक देऊन गौरवण्यात आले.

नाशिक स्मार्ट सिटीच्या स्मार्ट स्कूल या प्रकल्पाला हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. नाशिक महापालिकेच्या ६९ शाळांना स्मार्ट स्कूल बनवण्याचे कार्य नाशिक स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सुरु आहे. डिजिटल सोल्युशन्स चा वापर करून मनपाच्या शाळांचा स्मार्ट स्कुलमध्ये यशस्वी कायापालट केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारासाठी सर्व सरकारी, पीएसयु, १०० स्मार्ट सिटी, केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषद सरकारी कार्यालयांकडून एकूण ३७६ प्रकल्पांची नामांकने प्राप्त झाली होती. पहिल्या स्तरावरील पडताळणी दरम्यान ३७६ नामांकनांपैकी १०७ नामांकनांची निवड, विविध क्षेत्रातील आयएएस अधिकारी आणि प्राध्यापक समाविष्ट असलेल्या उच्च दर्जाच्या परिक्षकांद्वारे करण्यात आली. ’डिजिटल सोल्युशन्स वापरून नाशिक मनपा शाळांचे स्मार्ट शाळांमध्ये रूपांतर’ हा प्रकल्प सिल्व्हर श्रेणी मध्ये निवडला गेला.

या पुरस्काराचे वितरण मोहम्मद इस्राईल मन्सुरी (माहिती तंत्रज्ञान मंत्री, बिहार), प्रकाश साव्हानी (सचिव इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय), डॉ.समीर शर्मा (मुख्य कार्यकारी अधिकारी व माजी सचिव,आंध्र प्रदेश), सुबोध अग्रवाल (अतिरिक्त मुख्य सचिव पीएचईडी आणि जलसंसाधन राजस्थान सरकार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नाशिक स्मार्ट सिटीच्या वतीने सदर पुरस्कार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे विभाग प्रमुख अनिल तडकोड, नाशिक मनपाचे शिक्षणाधिकारी बापूसाहेब पाटील तसेच पॅलेडियम कंपनीचे सल्लागार अंशुमन कुमार यांनी स्विकारला.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नाशिक मनपा आयुक्त डॉ.अशोक करंजकर, नाशिक स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे यांनी स्मार्ट स्कूल प्रकल्पासंबंधित अधिकारी व कमर्चारी वर्गाचे अभिनंदन केले आहे.

### होळनांथे येथे आज मुक मोर्चा

**होळनांथे । प्रतिनिधी**

गोंडगाव ता. भडगाव येथील चिमुकली कल्याणीवर अत्याचार करणार्या आरोपीला त्वरित फाशीची शिक्षा करावी या मागणीसाठी होळनांथे येथे मूक मोर्चाचे आयोजन केले आहे तर शिरपूरचे तहसीलदारांना निवेदनही देण्यात येणार आहे.

गोंडगाव येथील घटनेच्या जाहीर निषेध करण्यासाठी तसेच घटनेतील आरोपीला त्वरित फाशी देण्याच्या मागणीसाठी होळनांथे येथे आज मंगळवार रोजी सार्वजनिक रित्या मुक मोर्चाचे आयोजन केले आहे. सायंकाळी ००:०६ वाजे दरम्यान आयोजित मूक मोर्चेत सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तसेच सकाळी ठीक ११:०० वाजेला तहसीलदार शिरपूर यांना शिरपूर येथील समाज बांधवांकडून निवेदन देण्यात येणार आहे.

# दिवंगत महानोर, देसाई, सोनाळकर, घायवट, गदर यांना नाट्यपरिषदेने नाट्यमंदिरात वाहिली श्रद्धांजली

**धुळे । प्रतिनिधी**



गत आठवडा हा खूप वाईट ठरला. समाजातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे निधन झाल्याच्या घटना घडल्या. यामुळे समाजाची अपरिमित हानी झाली आहे. कारण समाज घडविण्यात, समाजाला नवा विचार देणार्या काही व्यक्तिरेखा काळाने आपल्यातून हिरावून नेल्या. त्यात दिवंगत रानकवी, पद्मश्री ना. धों. महानोर, चित्रपट कला दिग्दर्शक नितीन देसाई, तेलंगणातील क्रांतिकारी कवी, गायक गुम्मदी विठ्ठल राव उर्फ गदर, प्रा. शेखर सोनाळकर, आंबेडकरी कवी, गायक, संगीतकार कालकथीत प्रा. सुरेश घायवट या दिग्गजांचा समावेश आहे. या सर्व दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दि ७ जुलै रोजी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज नाट्यमंदिरात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ६ झालेल्या या शोकसभेत श्रद्धांजली वाहताना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य तथा जेष्ठ दिग्दर्शक, अभिनेते, पत्रकार चंद्रशेखर पाटील म्हणाले की, एकाच आठवड्यात साहित्य, कला, सांस्कृतिक, सामाजिक चळवळीतील या दिग्गजांचीएक्झिट मनाला चटका लावून गेली आहे. एकाच वेळी पाच महनीय व्यक्तींना एकत्रित श्रद्धांजली वाहण्याची वेळ येणे हे खूपच दुर्दैवी आहे. या सर्व मात्तबर लोकांनी जगाचा निरोप घेतल्याने महाराष्ट्राच्या साहित्य, कला, सांस्कृतिक, सामाजिक चळवळीच्या दृष्टीने मोठे हानिकारक ठरले आहे. अहिराणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष भगवान पाटील यांनी दिवंगत कवी ना. धों. महानोर व प्रा. शेखर सोनाळकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल यांनीही मनोगत व्यक्त करताना दिवंगत व्यक्तींच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकला. यावेळी जेष्ठ पत्रकार तथा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, नाट्य-चित्रपट कलावंत सुभाष शिंदे, ऑर्केस्ट्रा कलावंत राकेश काकडे, नाट्यगृहाचे संचालक राजेंद्र भावसार, युवा नाट्यकर्मी सुजय भालेराव, राहुल मंगळे, हर्षल परदेशी, स्वराज सावंत यांनीही दिवंगतांना श्रद्धांजली वाहिली.

# मोर्चात नियमांचा भंग; चौदा जणांविरुद्ध गुन्हा

**धुळे । प्रतिनिधी**

मणिपूर येथे आदिवासी समाजातील महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ गुरुवारी (ता. ३) काढण्यात आलेल्या मोर्चात नियमांचा भंग झाला. वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीजवळून मोर्चा निघाला. त्या वेळी नियमांचा भंग करण्यासह मोर्चेकऱ्यांनी लाठ्याकाठ्या बाळगल्याने आयोजकांवर गुन्हा दाखल झाला.

# शासनातर्फे अन्नदिनानिमित्त रेशन दुकान नं. ४४ येथे शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्यवाटप

**धुळे । प्रतिनिधी**



शासनातर्फे अन्नदिनानिमित्त सोमवार दि. ७ जुलै रोजी मोफत धान्यवाटप करण्यात आले. शहरातील साक्री रोडवरील स्वामी पद्मनाभ नगर येथे रेशन दुकान क्रमांक ४४ मध्ये हा मोफत धान्यवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगरसेवक सुनील बैसाणे, बन्सी जाधव, माजी नगरसेविका कशीश उधासी, वंदना बागुल, रेशन दुकानदार चालक मालक संघर्ष व समन्वय समितीचे उपाध्यक्ष राजेश ओहाळ, अमर ओहाळ या मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य वाटप करण्यात आले, यात प्रति लाभार्थी २ किलो गहू ३ किलो तांदूळ व १ किलो साखर याप्रमाणे वाटप करण्यात आले. कुणीही पात्र लाभार्थी धान्य वाटपापासून वंचित राहणार नाही अशा पध्दतीने धान्यवाटपाचे नियोजन करुन वाटप करण्यात येत असल्याचे राजेश ओहाळ यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.



# पांझरा चौपाटीवरील उद्यानाचेकाम प्रगतिपथावर

### खासदार डॉ. सुभाष भामरेंकडून पाहणी

**धुळे । प्रतिनिधी**

शहरासाठी प्रमुख आकर्षण ठरणार्या पांझरा चौपाटी येथील उद्यानाचे काम प्रगतीपथावर आहे. या उद्यानाचा लोकार्पण सोहळा लवकरच

जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, माजीमंत्री जयकुमार रावल यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने हे उद्यान साकार असून हे धुळेकरांसाठी आनंददायी असल्याचे प्रतिपादन खा.डॉ. सुभाष भामरे यांनी केले.

महापालिकेमार्फत शासनाच्या मूलभूत सेवा सुविधा निधी अंतर्गत सुमारे ५ कोटी व मनपा विकास निधी अंतर्गत सुमारे २ कोटी अशा एकूण सात कोटी निधीतून पांझरा नदीकिनारी असलेल्या चौपाटीवर प्रस्तावित उद्यानाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. खा.डॉ.सुभाष भामरे तसेच महापौर सौ.प्रतिभा चौधरी, आयुक्त देविदास टेकाळे, भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महानगराध्यक्ष अनुप अग्रवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या निधी अंतर्गत उद्यानात खोदकाम करणे, कंपाउंड वॉल, जॉगिंग ट्रॅक, कारंजा, रिटेनिंग वॉल, बोरवेल, वृक्ष लागवड,भुलभुलैय्या प्लांटेशन उद्यानात विद्युत व्यवस्था आदी कामे घेण्यात आलेली होती. करण्यात येणार असून त्यानिमित्त या कामाची पाहणी करण्यात आली. याप्रसंगी माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, उपायुक्त विजय सनेर, माजी स्थायी समिती सभापती शितल नवले, सामाजिक कार्यकर्ते ओम खंडेलवाल, प्रवीण अग्रवाल, रमेश चौधरी आदी उपस्थित होते.

# सप्तश्रृंगी गड विकास आराखड्याच्या मंजुरीसाठी पालकमंत्र्यांचे मुख्यमंत्र्यांसह ग्रामविकास मंत्र्यांना पत्र

### निधी मंजूर होवून कामांना लवकर सुरवात होणार असल्याची पालकमंत्री भुसे यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**



श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी देवी सप्तश्रृंगी गडाच्या विकासा संदर्भात पालकमंत्री दादाजी भुसे यांनी पाठपुरावा केला असून सुधारित प्रस्तावाला लवकरात-लवकर मंजुरी देण्याबाबत पालकमंत्री दादाजी भुसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांना पत्रव्यवहार केला आहे. गडाच्या विकासासाठी कुठलाही निधी कमी पडू दिला जाणार नाही, येत्या काही दिवसात मंजुरी मिळून निधी वितरीत होवून कामांना प्रत्यक्षात सुरवात होणार असल्याची माहिती मंत्री भुसे यांनी दिली.

पालकमंत्र्यांच्या आग्रही भूमिकेमुळे सप्तशृंगी गडाच्या विकासाबाबत लवकरच निर्णय होणार आहे. सप्तशृंगी गड ब वर्ग तीर्थक्षेत्र स्थळाच्या मुलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी विकास आराखडा शासनास सादर केला होता. उच्चाधिकार समितीने दिलेल्या सुचनांप्रमाणे मुळ आराखडयात बदल करून सुधारित आराखडा अंदाजपत्रकांसह दि. १२ जुलै २०२३ रोजी ग्राम विकास विभागास सादर करण्यात आलेला आहे. यासाठी नाशिकचे पालकमंत्री दादाजी भुसे यांनी वेळोवेळी बैठका घेत गडाच्या विकासासंदर्भात पाठपुरावा केला आहे.

श्री सप्तश्रृंगी देवी हे साडेतीन शक्ती पिठापैकी अर्धपीठ असुन मोठया संख्येने भाविक व पर्यटक येत असतात. त्यामुळे सुधारित आराखडयात नमूद केलेल्या मुलभूत व पायाभूत सुविधा पुरविणे अत्यंत आवश्यक असल्याने सुधारित आराखडयास मंजुरी देवून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मंत्री भुसे यांनी पत्राद्वारे नुकतीच केली आहे. श्री क्षेत्र सप्तश्रृंगी देवी, सप्तश्रृंगी गड, ता. कळवण हे तिर्थक्षेत्र साडेतीन शक्तीपीठापैकी अर्धपीठ आहे. त्याठिकाणी यात्रेकरिता साधारणतः २५ ते ३० लाख भाविक व पर्यटक येतात. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या संदर्भीय शासन निर्णयान्वये सदर क्षेत्रास ब वर्ग दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. सदर क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता या ठिकाणी पर्यटक व भाविकांसाठी मुलभूत व पायाभूत सुविधा पुरविणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर तिर्थक्षेत्राचा २३०२.५० लक्ष इतक्या रक्कमेचा विकास आराखडा शासनास सादर करण्यात आला होता. यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, उच्चाधिकार समिती यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. याबाबत जिल्हास्तरावर पालकमंत्री भुसे यांनी संबंधित आमदार, लोकप्रतिनिधी, संबंधित ट्रस्ट पदाधिकारी, कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी, सप्तश्रृंगी गड ग्रामपंचायत सदस्य, गांवकरी आदीं समवेत वेळोवेळी बैठका घेऊन सदर आराखड्यातंर्गत शासनास पहिल्या टप्प्यात सादर करावयाची अंदाजपत्रके संबंधित यंत्रणांकडून तयार करुन घेण्यात आली आहेत.

## महाराष्ट्राचे महागद्दार, केवळ पैशांचे लोभी

उद्धव ठाकरे यांच्या पक्षातून आमदार, खासदार, पदाधिकारी मोठ्या संख्येने निघून गेले आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील झाले. निवडणूक आयोगाने शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता दिली आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्हही त्यांना बहाल केले. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षात मोठा उठाव होऊन वर्ष उलटून गेले पण आपण सत्ता गमावली, मुख्यमंत्रीपद गेले यापासून मातोश्री काही बोध घेण्याच्या अजून मन:स्थितीत नाही. शिवसेनेच्या आमदार, खासदार, पदाधिकारी किंवा सामान्य शिवसैनिकांपेक्षा आपल्याला पैशाचा लोभ अधिक आहे, हेच उबाठा सेनेच्या प्रमुखांनी दाखवून दिले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी आणि १३ खासदारांनी मातोश्रीला सोडचिठ्ठी दिली, तेव्हापासून त्यांना गद्दार म्हणून हिणवले जात आहे. डुक्कर म्हणून त्यांची संभावना केली. शिंदे सरकारची नेहमीच मिंधे सरकार म्हणून टवाळी केली. पण हेच सर्व शिलेदार शिवसेना वाढविण्यासाठी वर्षानुवर्षे रक्ताचे पाणी करीत होते, याचा मातोश्रीला विसर पडला. जोपर्यंत ते मातोश्रीच्या नेतृत्वाखाली गप्पगुमान काम करीत होते तोपर्यंत ते चांगले होते, निष्ठावान होते, पण ज्या दिवशी त्यांनी बंडाचा झेंडा फडकवला तेव्हापासून त्यांना गद्दार ठरवले गेले. शिवसेना फोडण्यासाठी प्रत्येकाला ५० खोकी दिली गेली असाही अपप्रचार उबाठा सेनेने वर्षभर चालवला व आजही चालवला जात आहे. शिंदे यांच्या शिवसेनेतील कोणी आमदार-खासदर नुसते कुठे दिसले की, पन्नाश खोके, एकदम ओके अशा घोषणा देऊन त्यांना अपमानीत करण्याचा सातत्याने प्रयत्न झाला. शिंदे हे मुख्यमंत्री आहेत. पण त्यांचा सदैव मिंधे म्हणून उल्लेख करणे हे कोणत्या संस्कृतीत बसते? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी त्यांच्याविषयी काही भाष्य केले तर मुख्यमंत्र्यांचा अवमान झाला म्हणून राणे यांच्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस यंत्रणा कशी राबवली गेली हे सर्व महाराष्ट्राने बघितले आहे. एकनाथ शिंदे हे दिलदार व उदार मनाचे आहेत, आपल्याला वारंवार मिंधे म्हणून टोमणे मारतात व अपमान करतात म्हणून त्यांनी ठाकरे व त्यांच्या सग्या- सोयऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांची फौज वापरली नाही. जो दिलदारपणा शिंदे यांच्याकडे आहे तो ठाकरे यांच्याकडे नाही. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन शुक्रवारी संस्थगित झाले. या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठा गटाचे पूर्ण वस्त्रहरण केले. पैशासाठी उबाठा गट कसा उतावीळ आहे, हे त्यांनी महाराष्ट्राला सांगितले. मुख्यमंत्र्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. विशेष म्हणजे सभागृहाला एक कागद दाखवून उबाठा गटाकडून ५० कोटींसाठी एक पत्र आल्याचे सांगितले. ५० खोके, एकदम ओके अशा घोषणा देता आणि शिवसेनेच्या खात्यातील ५० कोटी आमच्या खात्यावर वर्ग करा अशी मागणी करणारे आम्हाला पत्र पाठवता. आम्हाला गद्दार म्हणायचे आणि ५० कोटी द्या म्हणून पत्र पाठवायचे असा भांडाफोड करून मुख्यमंत्र्यांनी उबाठा सेनेची लक्तरेच राज्याच्या वेशीवर टांगली. उबाठा सेनेच्या गटाचा कसा दुटप्पीपणा आहे, हे मुख्यमंत्र्यांनी उघड केले. निवडणूक आयोगाने खरी शिवसेना कोणती हा निर्णय दिला आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना अधिकृत आहे व त्याला निवडणूक आयोगाने मान्यता दिली आहे. मग शिवसेनेच्या खात्यावर असलेले ५० कोटी हे उबाठा सेना आमच्या खात्यावर वर्ग करा असे कसे काय म्हणू शकते? खरे तर एकनाथ शिंदे ते पैसे आपल्याकडे ठेऊ शकले असते. तो पैसा पक्षाचा आहे. संघटनेचा आहे. शिंदे यांच्याकडे खरी शिवसेना आहे असा निकाल असताना ते पैसे उबाठाला देण्याची गरज नव्हती. पण शिंदे यांचा दिलदारपणा मोठा आहे. तुमचे पैसे आम्हाला नकोत, तुमचे आम्हाला काहीही नको असे बाणेदारपणे सांगणारे एकनाथ शिंदे यांच्यासारखा दुसरा नेता शोधावा लागेल. खरी शिवसेना आमच्याकडे आहे पण ते पैसे त्यांना देऊन टाका, त्यांचे काही आपल्याला नको अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी मांडली.

# मुलांना स्मार्ट बनवा, पण...



आपली अनेक दैनंदिन कामे सोपी करणाऱ्या स्मार्टफोनच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. लहान मुलांना स्मार्टफोनच्या धोक्यांबद्दल पुरेशी माहिती नसते. फोनच्या अतिवापराचा धोका समजण्याइतके ते हुशार नसतात; परंतु पालक सुज्ञ असतात. त्यामुळे आपल्या मुलाला फोनपासून अधिकाधिक लांब ठेवणे पालकांना जमले पाहिजे. त्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या अहवालात दिलेला ताजा इशारा समजून घेतला पाहिजे.

अलीकडेच राजस्थानमधील अलवरमध्ये घडलेल्या घटनेमधून प्रत्येक पालकाने धडा घ्यायला हवा. राजस्थानमधील एका घटनेत ऑनलाइन गेमिंगच्या सवयीमुळे एका १४ वर्षांच्या मुलाचे मानसिक संतुलन इतके बिघडले की त्याला सुधारगृहात पाठवावे लागले. जास्त वेळ स्मार्टफोन वापरल्याचा वाईट परिणाम मुलावर होऊ नये, याची खबरदारी घेतली पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून ऑनलाइन क्लासमुळे मुलांचा 'स्क्रीन टाईम' वाढला आहे. आज आपल्याला घराघरांमध्ये स्मार्टफोन पाहायला मिळतो. कोरोनाकाळात शिक्षणाचा काही पर्याय नसल्याने ऑनलाइन क्लास सुरू झाले आणि तेव्हापासून मुले अतिप्रमाणात मोबाइल फोन वापरू लागले. मुले घरी बसून अनेक तास मोबाइल स्क्रीन पाहून अभ्यास करू लागले. परिणामी, त्यांचा स्क्रीन टाईम वाढला. स्मार्टफोन हे मनोरंजनाचेही उत्तम साधन आहे आणि त्यामुळेच मुले अभ्यासासोबत ऑनलाइन गेमिंगच्या कचाट्यातही सापडले.

आता कोरोनाचा धोका टळला असला तरी अभ्यासासाठी फोन वापरतोय, हे मुलांचे कारण काही संपत नाही. त्यामुळे मोबाइल फोन वापरण्यासाठी ठरावीक वेळ नेमून देण्याची गरज वाढली आहे. सोप्या भाषेत सांगायचे, तर २४ तासांपैकी लहान मुले किती तास टीव्ही, लॅपटॉप, टॅबलेट आणि मोबाइल फोन वापरतात, याला स्क्रीन टाईम म्हणतात. जागतिक आरोग्य संघटनेने स्मार्टफोनचा वापर करणाऱ्या मुलांशी संबंधित धोके ओळखण्यास सुरुवात केली आहे. डिजिटल शिक्षणाचे मुलांवर होणारे शारीरिक आणि मानसिक परिणाम लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या मानव विकास संसाधन मंत्रालयाने 'प्रगत' नावाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यात ऑनलाइन वर्गांची संख्या आणि वेळ मर्यादित करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत.

आतापर्यंत मधुमेह, अतिताण, कर्करोग अशा घातक आजारांबद्दल आपण ऐकले आहे; मात्र आता स्मार्टफोन नावाचा विकारही फोफावतो. हा विकार गंभीर आजाराप्रमाणे धोकादायक आहे. स्मार्टफोनच्या अतिरेकी वापरामुळे 'युनेस्को'ने चिंता व्यक्त केली आहे. इतकेच नाही, तर शाळांमधून स्मार्टफोन हद्दपार करा असा अहवालच दिला आहे. स्मार्टफोन हा तुमच्या आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. हातात स्मार्टफोन नसलेली व्यक्ती आज अभावानेच पाहायला मिळते. आपल्याकडे शाळा, कॉलेजमध्ये स्मार्टफोन वापरावर बंदी असली तरी लपून-छपून स्मार्टफोनचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी नाही. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना खूप फायदा होत असला तरी त्याचे अनेक दुष्परिणाम असल्याचे मत 'युनेस्को'ने आपल्या अहवालात मांडले. डिजिटल शिक्षणात अफाट क्षमता असली तरी ते शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातल्या प्रत्यक्ष संवादाची जागा घेऊ शकत नाही. कोणतेही तंत्रज्ञान शिक्षकांची जागा घेऊ शकत नाही. शिक्षण हे मानवकेंद्रीत असायला हवे.

स्मार्टफोनच्या अतिवापराचा शैक्षणिक कामगिरीवर थेट परिणाम होत असल्याने शैक्षणिक कामगिरी खालवल्याचेही या अहवालात म्हटले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कोणत्याही प्रकारच्या डिजिटल तंत्रज्ञानाकडे शिक्षणातील सहाय्यक घटक म्हणून पाहायला हवे, अशा परखड शब्दांमध्ये 'युनेस्को'ने आपले मत मांडले. शिवाय बरीच मुले ऑनलाइन अभ्यास करता करता 'सोशल मीडिया' आणि रिल्समध्ये घुसखोरी करतात. त्यामुळे अभ्यासाची लिंक तुटून जाते. आता 'युनेस्को'चा अहवाल प्रत्येक देश किती गांभीर्याने घेतो आणि त्यानुसार शिक्षणपद्धतीत बदल करतो हे पाहावे लागेल. मोबाइलमुळे लहान मुलांमध्ये चिडचिडेपणा, अतिताण यासारखे आजार वाढले आहेत. उलट, मोबाइल न दिल्यासही मुलांमध्ये वाढणारा चिडचिडेपणा पालकांसाठी डोकेदुखी होऊन बसला आहे. यामुळे डोळ्यांचा त्रास आणि इतर आजारांना आमंत्रण देण्याचे काम हा मोबाइल करत आहे. वॉशिंग्टनमधील 'सेपियन लॅब्स' या स्वयंसेवी संस्थेने जागतिक स्तरावर केलेले एक संशोधन सध्या जगभरात चर्चेचा विषय ठरत आहे. मोबाइल, स्मार्टफोन, टॅब याचा वापर आता इतका वाढला आहे की, लहान मुलांनाही सर्रास स्मार्टफोन वापरायला दिले जातात. पालकांनाही लहान मुलांना वेळ देता येत नाही. त्यामुळे स्मार्टफोन मुलांच्या हातात दिला जातो. परिणामी, मुले त्यात गुंतून राहतात आणि पालकांनाही आपापले सोपस्कार पार पाडता येतात.

लहान मुले काही काळातच 'स्मार्टफोन युजर फ्रेंडली' बनतात, याचेही कौतुक अनेक पालकांना असते. आपला पाल्य लहान असून मोबाइल उत्तमरीत्या हाताळतो, असे काही पालक अभिमानाने सांगतात; पण ही अभिमानाने सांगण्याची गोष्ट नाही, असे 'सेपियन'च्या संशोधनातून समोर आले आहे. जेवढ्या उशिरा मुलांच्या हातात स्मार्टफोन द्याल, तेवढे त्यांचे मानसिक आरोग्य स्मार्ट राहू शकते. कमी वयात लहान मुलांच्या हातात स्मार्टफोन दिला गेल्यास मोठे झाल्यानंतर या मुलांना गंभीर स्वरूपाचे मानसिक आजार जडू शकतात. त्यातही पुरुषांपेक्षा महिलांच्या मानसिक आरोग्यावर अधिक परिणाम होत असल्याचे 'सेपियन'च्या संशोधनातून समोर आले आहे. 'एज ऑफ फर्स्ट स्मार्टफोन अँड मेंटल वेलबिइंग आऊटकम्स' या नावाने हे संशोधन १४ मे रोजी प्रकाशित करण्यात आले. आता १८ ते २४ या वयोगटातल्या मुला-मुलींना लहानपणी कितव्या वर्षी स्मार्टफोन देण्यात आला आणि त्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर काय परिणाम झाला, याबाबत संशोधन करण्यात आले. 'ग्लोबल माइंड प्रोजेक्ट' या अभियानांतर्गत 'सेपियन लॅब्स'ने हे संशोधन केले. या संशोधनासाठी या वर्षी जानेवारी ते एप्रिलदरम्यान १८ ते २४ या वयोगटातील २७ हजार ९६९ मुलांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास केला गेला. उत्तर अमेरिका, युरोप, लॅटिन अमेरिका, दक्षिण आशिया आणि आफ्रिकेमधील ४१ देशांमधून हा सर्व्हे केला गेला. भारतामधील चार हजार युवकांचा या संशोधनात समावेश करण्यात आला होता.

या संशोधनात समोर आलेली महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या हातात स्मार्टफोन जेवढ्या उशिरा पडला, तेवढा त्यांच्यातील आत्मविश्वास वाढला, इतरांशी सकारात्मकतेने संबंध ठेवण्याची क्षमता वाढली. तसेच आयुष्यात उशिरा स्मार्टफोन वापरायला सुरुवात करणाऱ्या मुलींच्या स्वभावातील मूड, दृष्टिकोन, अनुकूलता आणि लवचिकता अधिक असल्याचे लक्षात आले. याव्यतिरिक्त मुलांना अतिशय लहान वयात स्मार्टफोन हाताळण्यास मिळाल्यामुळे त्यांच्यात आत्महत्येचे विचार, इतरांच्या प्रती आक्रमकतेची भावना, वास्तवापासून दूर राहणे, कल्पकतेमध्ये घट अशा अनेक मानसिक समस्या दिसून आल्या. भारतातून केवळ चार हजार मुलांचा या संशोधनात सहभाग असला तरी हे प्रमाण सावधानतेचा इशारा देण्यासाठी पुरेसे आहे.

भारतात दहा ते १४ वयोगटातील ८३ टक्के मुलांच्या हातात स्मार्टफोन आहे. आंतरराष्ट्रीय प्रमाणापेक्षा ही संख्या ७६ टक्क्यांनी अधिक आहे. हे संशोधन कमी वयात तंत्रज्ञानाच्या होत असलेल्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. भारतात १५ ते २५ या वयोगटातील मुलांची संख्या २० कोटी एवढी आहे, त्या आनुषंगाने या संशोधनातील निष्कर्ष शाळा, पालक आणि इतरांसाठी दिशादर्शक ठरतील. सलग दोन ते तीन तासांपेक्षा जास्त काळ मोबाइलचा वापर केल्याने मुलांच्या एकाग्रतेवर परिणाम होत आहे. वागण्यात बदल, चिडचिडेपणा, डोळ्यांचे आजार वाढत आहेत. तसेच 'सोशल मीडिया'च्या वापरामुळे २० ते ३० टक्के मुलांमध्ये मानसिक आजार जडत आहेत. आता 'ऑनलाइन एज्युकेशन'साठी मोबाइलचा वापर वाढला आहे. परिणामी, डोळ्यांचे आजार, चिडचिडेपणाही वाढल्याच्या तक्रारी पालक करत आहेत. केस स्टडीजनुसार पाच वर्षांपासून वयोवृद्धांपर्यंत मानसिक आजार वाढल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यात मुलांचे प्रमाण तब्बल २० ते ३० टक्क्यांपर्यंत आहे. आजच्या काळात स्मार्टफोन वापरणे टाळता येणार नाही, हे वास्तव आहे, मात्र त्यात तारतम्य आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत हे खरेच.

**- अजय तिवारी**

# प्रवासी पुन्हा वेठीस

मुंबई शहराची दुसरी लाइफलाइन असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मागील चार दिवसांपूर्वीपासून सुरू केलेल्या काम बंद आंदोलनामुळे पुन्हा एकदा भरडले आहेत ते बेस्टचे प्रवासीच. संप आहे कंत्राटदारांच्या कंत्राटी कामगारांचा आणि भरडले गेले आहेत प्रवासी. वास्तविक पाहता हे प्रकरणच कंत्राटदार व त्यांच्या कामगारांबद्दलचे आहे. मात्र नाहक त्रास हा बेस्टच्या प्रवाशांना होत आहे. यात बेस्ट प्रशासनाने आपले हात कितीही झटकले तरी व आपला यात काय संबंध असे दाखवण्याचा प्रयत्न केला तरी गोष्ट जेव्हा प्रवाशांपर्यंत येते तेव्हा मात्र बेस्टला याची दखल घेणे कर्मप्राप्तच आहे. वरवर पाहता हे असे कंत्राटदारांच्या कंपन्यांचे संप (संप म्हणण्यापेक्षा काम बंद आंदोलन म्हणू या) हे सध्या तरी बेस्टला व तसे पाहता प्रवाशांना नवीन नाही. मागील ऑक्टोबर महिन्यात मातेश्वरीच्या सांताक्रूज, मजास व प्रतीक्षा नगर आगारातील बस कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले होते. या कंत्राटदाराच्या चालक व वाहकांनी हे आंदोलन दिवाळी बोनस व पगारवाढीसाठी केले असल्याने



४०० हून अधिक बस गाड्या जागीच उभ्या राहिल्या होत्या. पुन्हा सप्टेंबर २२ मध्ये टाटा मोटर्स लिमिटेडच्या शिवाजीनगर आगारातील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले होते.


बेस्ट प्रशासनाने या कर्मचाऱ्यांकडून बस प्रवासात तिकीट आकारणी सुरू केल्याने हे कर्मचारी संतप्त झाले होते व बेस्टमधून प्रवास करण्यासाठी आपल्याला कंत्राटदाराकडून मोफत बसपास मिळावा यासाठी हे आंदोलन सुरू झाले होते, याचे लोण नंतर वरळी, मालवणी व बेकबे आगारापर्यंत पोहोचले होते. मागील जुलै महिन्यातच वडाळा आगारातील एमपी ग्रुपमार्फत चालवण्यात येणाऱ्या या कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले होते. या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कंत्राटदाराने काही महिन्यांचे वेतन दिले नव्हते. वडाळा आगारापासून सुरू झालेली हे काम बंद आंदोलने नंतर मग वांद्रे, कुर्ला, कुलाबा ते विक्रोळी आगारापर्यंत पोहोचले. या कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून मागील दोन वर्षांत तीन ते चार तीव्र आंदोलने केली गेली, मात्र यात भरडला गेला तो सामान्य प्रवासी. हे आंदोलन नंतर इतके तीव्र झाले की आपल्या मागण्या मागता मागता कर्मचारी इतके थकले की सर्व गोष्टींवर पाणी सोडून बेस्टलाच त्यांनी रामराम ठोकला. त्यामुळे त्या एमपीजी या कंत्राटदाराचे नाव खराब झाल्यामुळे अवस्था इतकी वाईट झाली. त्याला जुने कर्मचारी सोडून. गेले ते गेले व नवे कर्मचारी मिळेना. त्यामुळे आहे त्या अवस्थेत आपल्या बसेस त्याच स्थितीत टाकून त्याला रातोरात आपला गाशा गुंडाळावा लागला आणि अशा प्रकारे बेस्ट उपक्रमातून आधी पीएनएम व नंतर एमपीजी ग्रुप यांनी आपला गाशा गुंडाळला. आता सध्या हीच परिस्थिती बेस्ट अनुभवत आहे.

सध्या बेस्ट उपक्रमात सात कंत्राटदार आहेत. हंसा मारुती, टाटा मातेश्वरी, ऑलेक्षा व स्विच यांच्या मिळून १ हजार ७७१ बस गाड्या आहेत व स्वमालकीचा १ हजार १०० च्या आसपास बस आहेत. कंत्राटाच्या बस गाड्या स्वमालकीच्या बसपेक्षा जास्त आहेत व यापुढेही स्वमालकीचा बस ताफा कमी करत व त्या जागी नव्या बस न घेता कंत्राटदारांच्या बस कशा प्रकारे घेता येतील. यावर बेस्टचा जोर असणार आहे. केंद्र सरकारच्या अवजड वाहतूक विभागाकडून इलेक्ट्रिक बसगाड्या घेण्यासाठी सवलत मिळते.

**- क्रमश:**

**- अल्पेश म्हात्रे**

## शब्दकोडे-१४३



आडवे शब्द -

१. अवेळी, अपेक्षित नसताना ३. सन्मानाची रक्कम ७. कोर्टातील दावा ९. अमावस्या १०. काही कामधंदा नसलेल्या माणसाला मिळणारे विशेषण १३. त्रिगुणांपैकी प्रामुख्याने आढळणारे दोन १५. फूल, पुष्प १६. पोकळ दाणा, टरफल, असत्य १७. वाचा १८. सीताहरण करणारा १९. नारळाचे झाड २०. बातमी, समाचार २१. गावकारभारी २३. हस्ते परहस्ते २४. विष २५. बदल २६. दहावा ग्रह! २८. फरक, तफावत २९. सत्ता ३०. घोडे बांधण्याची जागा ३१. नशा अणणारा पदार्थ ३३. साखरेचा रस ३५. धेनू ३६. लाकूड कापण्याचे साधन ३८. मराठीत प्लॅटफॉर्म ४०. बरोबर आलेला फौजफाटा ४१अ. ढीग, चवड ४३. लापशी ४४. मरेपर्यंत ४७. बढाईचा बडबड ४८. रोखलेली नजर ५०. पक्ष्यांचा समूह ५१. जंगलातील वाट ५४. बारीकासारीक ५६. सजीवनिर्जीव सर्व ५८. इन्शुरन्स (मराठी) ५९. अवधान ६१. चंद्र ६२. ओळखणे, समजणे, जाणणे ६३. अत्यंत गरजेच्या वेळी ६५. गोड्या पाण्यातील एक मासा ६६. उलटी, ओकारी ६८. तमाशातील कलाकार ६९. रवाळ ७०. सारंग आडनावाचा दिवंगत अभिनेता-दिग्दर्शक ७२. उपहास ७३. ताणलेल्या दोरीचा आवाज ७४. सावरण्याची गोष्ट ७५. उबग, कंटाळा

उभे शब्द -

१. अधिकात देण्याचे वाण २. जून, निबर ३. कह्यात ४. धमनी ५. मुंबईतील या इमारतीवर अतिरेक्यांनी हल्ला केला ६. विषयांतर करणे ७. बारीक दगड ८. तमाशातील गीत ११. कर्णेंद्रिय १२. मनाचा ओढा १४. महाराष्ट्राची राजभाषा १७. बातमीदार २०. वधूवरांची सवाद्य मिरवणूक २१. समशेर २२. लहर, तरंग २३. हस्तलाघव, जादू २५. संगोपन करणारा २६. जागृत ठिकाण २७. मेहरबानी ३०. घट्टच्या विरूद्ध ३२. पदार्थ शिजतानाचा आवाज ३४. भांडण ३७. तोंडी व्यवहार ३९. दु:ख ४१. व्यर्थ ४२. पोटाला लागलेली रग ४५. इजा, प्रहार ४६. बासरी ४७. जंगलातील प्राणी ४९. कुराणातील वचने ५२. पुरुष ५३. तापापूर्वीचे शहारे ५५. खिळे ठोकण्याचे

### शब्दकोडे १४२ चे उत्तर

**आडवे उत्तर**

२.सरकारी ५.वासुकी ८.कुडी ९.पाणिग्रहण १०.तथास्तु ११.रदबदली १३.टक १४.मस १५.शास्त्र १६.वार १७.नदी १९.उशीर २०.सखा २२.अंमल २६.नालायक २९.उबग ३०.हिमाचल प्रदेश ३२.रजा ३४.गवार ३५.हरण ३६.सवंग ३८.बगळा ३९.वितान ४०.कवटी ४१.पर्यटन ४२.नाना ४४.मांसल ४६.समयसूचकता ४९.मतलबी ५१.खडावा ५३.धाक ५४.बारा ५६.हेवा ५७.भाकरी ५९.खेटर ६०.तांबडा ६३.अडेल ६४.वादळ ६५.अंध ६६.रासभ ६८.मार्ग ६९.कामला ७१.मुंगळा ७२.डूल ७३.दृढ ७४.लहानसा ७५.शर ७७.नीर ७८.नाशवंत ७९.फाया

**उभे उत्तर**

१.माणिक २.सहनशील ३.रण ४.रीतसर ५.वास्तुशास्त्र ६.कीर ७.खबर ८.कुलीन ९.पाटव १२.दवाखाना १८.दीन १९.उमग २१.प्रिय २२.अंबर २३.सुमार २४.कोलकाता २५.संदेह २७.लाठी २८.करवंटी ३०.हिवाळा ३१.शरम ३३.जाग ३४.गगन ३६.सवलत ३७.आपत्ती ३८.बटवडा ३९.विनायक ४०.कसम ४२.नामधारी ४३.टोक ४५.तंबी ४७.चहाटळ ४८.ताबा ५०.लक्ष्मी ५१.खवा ५२.वाभाडे काढणे ५५.रातांधळा ५६.हेमामालिनी ५८.कलम ५९.खेदजनक ६१.डारडूर ६२.लोभ ६५.अंगदेश ६७.सल ७०.लालसा ७५.शत ७६.क्रिया

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### बसमध्ये विसरलेली बॅग प्रवाशाला परत

**धुळे ।** परिवहन विभागाच्या एका बसमध्ये चालक आणि वाहकाला पैशांची बॅग मिळून आली. मात्र, नियत शाबूत असणाऱ्या दोघांनी रोकड बघूनही आपला प्रामाणिकपणा सोडला नाही. धुळ्याहून रामी-बेहेडकडे काल सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास एस.टी. बस निघाली होती. वाहक डी. एन. वाघ आणि चालक मनोज श्रीराम बोरसे हे प्रवाश्यांसह मुक्कामस्थळी पोहोचले. बसमधून सर्व प्रवासी उतरल्यानंतर गाडीत एक अनोळखी बॅग वाहकाच्या निदर्शनास आली. त्यांनी बॅग चालक यांना दाखविली. बॅगेत १८ हजारांची रोकड मिळून आली. मात्र, प्रवाशीची ओळख पटेल असा कोणताही पुरावा त्यात मिळून आला नाही. अशा परिस्थितीतही वाहक वाघ आणि चालक बोरसे यांनी कुठलाही मोह होवू न देता सदरची बॅग धुळे आगार व्यवस्थापक मनोज पवार यांना सुपूर्द केली.

# गोंडगावात नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार करणार्या नराधमास कठोर शिक्षा द्यावी

## क्षत्रिय मराठा युवा प्रतिष्ठानचे जिल्हा प्रशासनास निवेदन

**नंदुरबार । प्रतिनिधी**

जळगाव तालुक्यातील भडगाव तालुक्यात गोंडगाव येथे नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन तिची निर्घुण हत्या करणार्या नराधमाला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी क्षत्रिय मराठा युवा प्रतिष्ठाने केली आहे.

याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी सुधीर खांदे यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, जळगाव तालुक्यातील भडगाव तालुक्यात गोंडगाव येथे एका नऊ वर्षीय मुलीवर झालेल्या अत्याचार करुन हत्येचा निषेध नोंदविण्यात येत आहे. नराधमाने नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन तिची निर्घुण हत्या केली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून निषेधार्थ आहे. या निंदणीय



घटनेचा समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. एका नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार होवून निर्घुण हत्या होत असेल तर महिला व मुलींच्या सुरक्षित नाहीत. निर्भया घटनेनंतर आतापर्यंत अनेक महिला, युवती व मुलींवर अत्याचार झाले आहेत. तसेच पिडीत मुलींसह युवतींची देखील हत्या केल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. या घटनेबाबत तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला होता. आता पुन्हा जळगाव जिल्ह्यातील भडगाव तालुक्यात गोंडगाव गावात एका नऊ वर्षीय मुलीवर झालेली अत्याचार व हत्येची घटना निषेधार्थ असून असे विकृत कृत्य करणार्या व नऊ वर्षीय मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या करणार्या नराधमाला कठोर शिक्षा व्हावी. तसेच सदर खटला जलदगती न्यायालयात चालवून दोषी नराधमास त्वरीत शिक्षा व्हावी, अशी मागणी क्षत्रिय मराठा युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रविण महेश मराठे, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक किरण गवळी, राजपूत समाजाचे अध्यक्ष मोहिनीराज राजपूत, भाजपा सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष भिमसिंग राजपूत, भीम आर्मी जिल्हाध्यक्ष संजय रगडे, वीर भगतसिंग व्यायाम शाळेचे अध्यक्ष संदीप चौधरी, दिनेश माळी, रामा मराठे, पिंटर पाटील, उपेंद्र राजपूत, राजा मराठे, दीपक मराठे, आतिष मराठे, प्रशांत देवरे, भुर्या माळी, कृष्णाराजे प्रविण मराठे आदींनी निवेदनातून केली आहे.

# बेसबॉल सॉफ्ट बॉल ऑफ महाराष्ट्र असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनील आडके

**नाशिक । वार्ताहर**

ऑलिंपिक मान्यताप्राप्त बेसबॉल सॉफ्ट बॉल ऑफ खेळाच्या बेस बॉल सॉफ्ट बॉल महाराष्ट्र असोसिएशनच्या अध्यक्षपदी सुनील आडके यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र त्यांना बेसबॉल सॉफ्ट बॉल असोसिएशनचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष संजय पाटील व बेसबॉल सॉफ्टबॉल फेडरेशनचे ऑल इंडिया अध्यक्ष जोगेंद्र सिंग यांनी त्यांना दिले आहे.



त्यांना निवडीच्या पत्रात असोसिएशनच्या वतीने अभिनंदन करण्यात आले असून त्यांनी महाराष्ट्रभर कानाकोपऱ्यात बेसबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार करावा. तसेच या खेळाच्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी मदत करावी, खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे. तसेच विविध खेळाडूंचे वयोगट तयार करून त्यांना स्टेट लेवल तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांना पाठवावे. या संघाना योग्य ते सहकार्य करावे तसेच मार्गदर्शन करावे असे पत्रात म्हटले आहे.

तसेच जिल्हास्तरावर व शहर पातळीवर बेसबॉल संघटना कार्यकारण्या निर्माण कराव्यात. त्यामुळे खेळाचा जास्तीत-जास्त प्रचार प्रसार होईल असे पत्रात म्हटले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल ना. गिरीष महाजन, आ. राहुल ढिकले, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक लोकसभा निवडणूक प्रमुख केदा आहेर, नाशिक जिल्हा ग्रामीण दक्षिण अध्यक्ष सुनील बच्छाव, दत्ता गायकवाड, निवृत्ती अरींगळे, सुधाकर जाधव, श्याम खोले, दिनकर आढाव, शरद मोरे, सचिन हंडगे, सुनील केदार, शिवजन्मोत्सव सोहळ्याचे विकास भागवत , किशोर जाचक, शिवाजी हांडोरे यांनी तसेच भाजपा नाशिक महानगर पदाधिकारी कार्यकर्ते व नाशिक रोड देवळाली व्यापारी बँकेचे आजी-माजी पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मानवस्पर्श संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**लासलगाव । वार्ताहर**

मानवस्पर्श सेवाभावी संस्था, लासलगाव या सामाजिक संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तळेगाव रोही शाळेतील १५५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.संस्थेने २०१६ पासून विविध सामाजिक उपक्रम राबविले असून शहिद जवान कुटुंब, समाजातील गरीब, दिव्यांग,गरजू व्यक्ती, दिपावली फराळ वाटप,शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्य यांना मदत करण्यात आली.आजपर्यंत संस्थेच्या वतीने १८ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे विश्वस्त प्रा.अरुण देवढे यांनी केले.त्यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली तसेच, विद्यार्थी व शिक्षक यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रविण भोकनळ (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती) यांनी भूषविले. संस्थेचे अध्यक्ष केशवराव जाधव, उपाध्यक्ष योगेश न्याहरकर, खजिनदार सूर्यकांत जाधव विश्वस्त प्रा.अरुण देवढे तसेच गावचे सरपंच भाऊसाहेब जिरे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र पाटील, सुकदेव केदारे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य योगेश रोकडे, गावचे पोलिस पाटील अविनाश अहिरे, गोरख वाकचौरे,मुख्याध्यापक सुहास फेगडे, शिक्षक ज्ञानेश्वरी राणे, भूषण निंबाळकर, विकास चेंडके, बालिका धिंडोळे हे मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमासाठी अनंत सोमवंशी (अमेरिका), ज्ञानेश्वर शिंदे(पुणे), सचिव प्रा.सुनिल देवढे, कार्याध्यक्ष ॲड.सुनिल वाघचौरे, विश्वस्त समीर देवढे, डॉ.शशिकांत देवढे, सोपान जाधव, ज्ञानेश्वर देवढे, सुरेखा देवढे, सभासद गोरख देवढे सर, प्रताप आढाव, सचिन शेलार सर, नवनाथ कोकणे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भुषण निंबाळकर यांनी तर आभार शाळेचे मुख्याध्यापक सुहास फेगडे यांनी मानले. या वेळी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आय.एम.आर.डी. च्या बी. बी.ए. अंतिम वर्षाचे विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत झळकले

**शिरपूर । प्रतिनिधी**

आर. सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील बी. बी.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मे-२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या विद्यापीठ स्तरीय परिक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले. आर. सी.पटेल परिसंस्थेत प्रथम क्रमाकांने उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळवला. अग्रवाल साक्षी दिलीप ९.८१ सी.जी. पी.ए. व ९३.६७ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत व्दितीय, फुलारी चैतन्य विनय ९.८१ सी.जी.पी.ए. व ९१.०२ टक्के मिळवत विद्यापीठात व परिसंस्थेत तृतीय, बुद्धिसागर तेजस्विनी प्रसाद ९.७९ सी.जी.पी.ए. व ९२.९१ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत चतुर्थ, पाटील प्रतीक्षा संजय ९.७९ सी.जी. पी.ए. व ९१.८८ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत पाचवे, शेख जैनाबी साजिद ९.७६ सी.जी.पी.ए. व ९१.०७ टक्के विद्यापीठात व परिसंस्थेत सहावे, शहा प्रथमेश विवेक ९.६५ सी.जी.पी.ए. व ८८.८४ टक्केविद्यापीठात आठवे व परिसंस्थेत सातवे स्थान, जैन विशाखा सुनील ९.६२ सी.जी.पी.ए. व ८८.३७ टक्के मिळवत विद्यापीठात नऊवे व परिसंस्थेत आठवे स्थान मिळविले.

# स्नेह बंधन बहुउद्देशीय संस्था मराठा वधुवर मेळावा संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

सगळीकडे देशात बेरोजगारी, आर्थिक मंदी, नात्यातील एकमेकांचा स्नेह अभाव, कमीपणा न घेणे व सगळं अनुकल पाहिजे, हट्ट- स्वार्थीवृत्ती, मुला मुलींचे शिक्षणाचा असमतोल,नसबंदी मुळे व वंशाला दिवाच हवा या अट्टाहासा पायी समाजाचं काही देणंघेणं नाही अशा अहंकारा पोटी अनेक मुलांचे रखडलेले विवाह ही प्रत्येक समाजात विस्कळीत झालेली फार मोठी समस्या आहे या करिता आपण दोन पाऊल मागं येऊन समाज वृध्दी साठी कमी अधिक पणा न पाहता तातडीनं समाजात सर्व थरातून विवाह जुळविण्याची गरज आहे व तसे प्रयत्न प्रत्येक व्यक्तीन करावे असे विचार वारकरी महामंडळ नाशिक अध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी परशुराम सायखेडकर नाट्यगृह येथे स्नेह बंधन बहुउद्देशीय संस्था नाशिक,मराठा वधू-वर सूचक मंडळ आयोजित मेळाव्यात व्यक्त केले.




यावेळी कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविक श्री प्रभाकर दिंडे व श्री अविनाश वाळुंजे यांनी व्यक्त केले. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून धुळ्याचे श्री शिवाजी राव मराठे,शामभाऊ जाधव, डॉ.सचिनकुमार पाटील, डॉ. विनायक शेणगे, मा.आमदार श्री नितिन भोसले, स्नेहबंधन बहु उद्देशिय संस्थेचे अध्यक्ष श्री रमेश काका भोसले, येवला पंचमंडळाचे अध्यक्ष श्री मधुकर सांबरे, सचिव श्री संजय पवार, मार्गदर्शक श्री देविदास नाना जाधव, श्री संजय जाधव,श्री तुकाराम वाघ,श्री दत्तात्रय जाधव,श्री जालिंदर मेंढकर,श्री. सुरेश माळोदे,श्री.मदन सिरसाठ आदी उपस्थित होते.प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन तसेच अतिथी सत्कार विवाह मंडळात उत्कृष्ट कार्य सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांच शाल श्रीफळ देऊन आभार व्यक्त करण्यात आले. प्रथम प्रास्ताविक करतांना प्रमुख मान्यवरांचा परिचय श्री प्रभाकर दिंडे यांनी करुन दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष श्री रमेश भोसले, श्री दत्तात्रय जाधव, श्री मधुकर बोजगे, श्री मदन सिरसाठ, श्री आर आर पाटील, श्री.दिपकराव थोरात, श्री.जयवंतराव उघडे, श्री नवनाथ झणकर, श्री रंगनाथ सिरसाठ, सौ. संजिवनी वाघ, श्री विलास जाधव, श्री सुरेश माळोदे, श्री अरुण शेळके, यांनी अनमोल सहकार्य केले.

# हर घर तिरंगा मोहिम २.० अंतर्गत राष्ट्रध्वजासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**नाशिक ।** आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने २०२२ मध्ये हर घर तिरंगा मोहिम सुरू करण्यात आली होती. याच अनुषंगाने हर घर तिरंगा २.० अंतर्गत पोस्ट विभागामार्फत राष्ट्रध्वज पुरविण्यात येणार असून त्यासाठी प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन नाशिक मंडळाच्या प्रवर अधीक्षक डाकघर यांच्या मार्फत शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये करण्यात आले आहे.

टपाल विभागामार्फत २०२३ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वज खरेदी करून नागरिकांना हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी होता येणार आहे. त्यासाठी टपाल विभागात २० इंच द ३० इंच (ध्वज खांबाशिवाय) आकाराचे राष्ट्रध्वज २५ रुपयात उपलब्ध आहेत. हे राष्ट्रध्वज घेण्यासाठी नागरिकांनी आगाऊ नोंदणी करीता प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालय, प्रधान डाकघर कार्यालय, नाशिक रोड येथे तसेच आपल्या नजीकच्या टपाल कार्यालयाशी १४ ऑगस्ट २०२३ पर्यंत संपर्क साधावा. तसेच राष्ट्रध्वज ऑनलाईन मागविण्यासाठी www.epostoffice.gov.in या संकेतस्थळावर १२ ऑगस्ट २०२३ पर्यंत नोंदणी केल्यास राष्ट्रध्वज आपणास घरपोच प्राप्त होणार आहे, असे ही प्रवर अधीक्षक डाकघर यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात



**लासलगाव । वार्ताहर**

राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे भरण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

लासलगाव ग्रामीण रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने राज्याचे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या माध्यमातून लवकर या रस्त्याचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. तोपर्यंत नागरिकांच्या सुविधेसाठी तातडीने खड्डे भरण्याच्या सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी केल्या होत्या. त्यानुसार आज या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

याबाबत मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचनेनुसार प्रदेश पदाधिकारी दिलीप खैरे यांनी अधिकाऱ्यांसमवेत रस्त्याची पाहणी केली होती.त्यानंतर तातडीने या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.


प्रोसेस जमा — ॲड. संदीप अर्जुन गर्दे

निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. चिफ/ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात**

फौ. कि. अर्जः- ७११/२०२३

सोमनाथ बारकू गर्दे उ.व.- ४४ वर्ष धंदा : शेती
रा.मु.कंधाने ता. मालेगाव जि. नाशिक .....**अर्जदार**

**विरूध्द**

मा. निबंधक सो. जन्म मृत्यू नोंदणी /
ग्रामसेवक ग्रामपंचायत, सडगाव ता.जि.धुळे .....**जाबदेणार**

ज्याअर्थी ललित सोमनाथ गर्दे यांचा जन्म हा दि. ०८/१०/२००६ रोजीची जन्मनोंद बाबत नोंदणी धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो.यांचे न्यायालयात अर्जदार श्री. सोमनाथ बारकू गर्दे यांचा मुलाचा जन्माची नोंद होऊन सक्षम अधिकाऱ्याकडून जन्म दाखला मिळणेकामी अर्ज केला आहे. सदर अर्जचे तारीखकामी १६/९/२०२३ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्ज बाबत जन्म नोंद होण्याबाबत तथा अर्जदारास जन्म नोंद प्रमाणपत्र मिळवण्याबाबत कोणाचीही काही हरकत असेल धुळे येथील मे. चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात हजर होऊन हरकत नोंदवावी. सदर दिवशी चौकशीकमी कोणीही हरकत न नोंदल्यास सदर अर्जाचा निकाल देण्यात येईल व अर्जदारास त्यांचे अर्जाचे दि. ०८/१०/२००६ रोजी जन्म झाल्याची नोंद नोंदणीचा चा आदेश देण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस आज ता. ०७/८/२०२३ रोजी आमच्या सही व कोर्टाचा शिक्कानिशी दिली आहे.

धुळे
दिनांकः ७/८/२०२३ — शिक्का — आदेशावरून

**कामगिरी कारकुन** — **सहायक अधिक्षक**
**धुळे येथील मे.चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात** — **धुळे येथील मे.चिफ ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. यांचे न्यायालयात**



निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो क. स्तर यांचे कोर्टात**

दि. कि. अर्ज नं. ९६३/२०२३

१. शुशीला गुलाब पाटील वय-७० वर्ष, कांमधदा-घरकाम
२. राजेंद्र गुलाब पाटील वय-५० वर्ष, कांमधदा-शेती
रा.नगाव ता जि धुळे
३. शोभाबाई निबा पाटील वय-५२ वर्ष, कांमधदा-घरकाम
रा. डांबली धादरणे ता शिदखेडा जि धुळे
४. रेखाबाई गोविद पाटील वय-५२ वर्ष, कामधंदा-घरकाम
रा. जुन्नर ता जि धुळे
५. प्रतिभा रामकांत पाटील वय-४० वर्ष, कामधंदा-घरकाम
रा. नाशिक ता जि नाशिक .....**अर्जदार**

**विरूध्द**

कै. गुलाब दोधा पाटील (मयत) मृत्यु दिनांक ११/६/२०२३ मुत्यु ठिकाण - नगाव ता जि धुळे

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो . क. स्तर यांचे न्यायालयात दि. ३/८/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं.९६३/२०२३चा अर्ज दाखल केलेला आहे ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. गुलाब दोधा पाटील (मयत)याचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित होवुन मिळण्यासाठी व इतर शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणर आहे. म्हणुन अर्जदार यानी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क. स्तर यांच्या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ५ याच्या नावाने वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.१५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं. ७, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-४/८/२०२३ — आदेशावरून

**व.लि** — शिक्का — **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.** — **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**



निशाणी नं.६

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ३रे सह दिवाणी न्यायाधिश साहेब वरीष्ठ स्थर यांचे कोर्टात**

स्पे.मु. नं. १८/२०२०

धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नौकरांची
सहकारी बँक लिमी. धुळे .....**वादी**

**विरूध्द**

मे. फेडरल कन्सलटन्सी वगैरे. .....**प्रतिवादी**

प्रति ३१ अ) श्री. गणेश सुरेश माळी, वय-३० धंदा-नोकरी रा. स्वामी विवेकानंद माद्यमिक विध्यालय, माळीवाडा, नंदुरबार ता. जि. नंदुरबार
३१ ब) श्री. नितीन सुरेश माळी, वय-२७ धंदा-नोकरी
३१ क) श्री. विजय सुरेश माळी, वय-२५ धंदा-नोकरी
३१ ड) श्रीमती सुनिता सुरेश माळी, वय - ५५ धंदा घरकाम
३१ इ) सुरेखा पिता सुरेश माळी, वय-२३ धंदा घरकाम
सर्व रा. द्वारा कृषीकार्यालय, कहाटुळ बिट, शहादा ता. शहादा जि. नंदुरबार

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी विरूध्द उपरोक्त न्यायालयात वर नमुद स्पे.मु.नं.१८/२०२० दाखल केला असुन तो न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्यातील मुळ प्रतिवादी नं. ३१ सुरेश गोरख माळी यांचे निधन झाल्याबाबत समन्सचा रिपोर्ट आल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत सदरकामी दिलेल्या अर्जाच्या अनुशंगाने मयताचे वारस म्हणुन वर नमुद केलेले प्रस्तावित प्रतिवादी नं. ३१ (अ) ते ३१ (इ) म्हणुन आपण असल्याने आपणास वेळोवेळी त्याबाबत नोटीस पाठविण्यात आल्या असता आपणावर प्रभाविपणे बजावणी होत नसल्याचे दिसते.

त्याआर्थी वर नमुद दाव्यातील मयत प्रतिवादी नं. ३१ सुरेश गोरख माळी यांचे वारस म्हणुन रेकॉर्डवर घेण्यासाठी दिलेल्या अर्जाच्या अनुशंगाने वर नमुद वारसांना सदर जाहिर नोटीसीने सुचित करण्यात येते की, सदर वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतच्या अर्जाची पुढील सुनावणी तारीख ०२/०९/२०२३ असुन सदर तारखेस सकाळी १०:३० वाजता सदर अर्जाच्या अनुशंगाने आपले म्हणने माडण्यासाठी स्वताः अगर माहितगार वकींला मार्फेत सदर दाव्याचे कामी हजर व्हावे असे निर्देश तुम्हाला या नोटीसी द्वारे देण्यात येत आहे. वर नमुद दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वर नमुद दाव्यातील वारस रेकॉर्डवर घेण्याबाबतच्या अर्जाचे कामकाज व सुनावणी होवुन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिले असे. — आदेशावरून

**कामगिरी कारकुन** — शिक्का — **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे** — **दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

## न्यूज कॉलम

### संचेती इंग्लिश स्कूलमध्ये दंतचिकित्सा शिबिर

**दोंडाईचा ।** येथील श्रीमती बसंतीबाई पाबुदानजी संचेती रोटरी प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये दंतचिकित्सा शिबिर झाले. डॉ. नितीन बिराडे यांनी विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी केली. बतुल बोहरी उपस्थित होते. डॉ. बिराडे यांनी दातांची काळजी कशी घ्यावी याची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष हिमांशू शाह, संचालक पी. सी. शिंदे, प्राचार्य श्रुतिरंजन बारिक आदींचे मार्गदर्शन लाभले.

### सावता माळी शाळेत पालक मेळावा सपंन्न

**धुळे ।** जुने धुळे परिसरातील सुभाष नगरातील सावता माळी प्राथमिक शाळा व आदित्य बाल विकास मंदिरात पालक मेळावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मीना अहिरे होत्या. हिरकणीबाई भील, पंडित पवार, दशरथ महाले आदी उपस्थित होते. - सरस्वती मातेच्या प्रतिमापूजनाने मेळाव्याला सुरुवात झाली. मीना , अहिरे व नितीन भदाणे यांनी पालकांना आधार कार्डविषयी माहिती दिली. मृणालिनी बाविस्कर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रतिभा बाविस्कर, भारती वाघ, मनीषा रोकडे, संगीता पवार आदींनी प्रयत्न केले. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी काळातील नियोजनाची माहिती देण्यात आली.

# जिल्ह्यातील सर्व रस्त्यांची डागडुजी होईपर्यंत शासनाने टोल बंद करण्याची एकमुखी मागणी

## निमा सभागृहातील बैठकीत उद्योजक आणि प्रमुख २६ संघटनांचा इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**




नाशिक जिल्ह्यातील सर्व राज्य व राष्ट्रीय महामार्गांची व इतर रस्त्यांची त्वरित डागडूजी करावी. याबाबत त्वरित निर्णय न झाल्यास टोल आकारू नये, असा निर्णय वजा इशारा नाशिक इंडस्ट्री मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) तर्फे निमा सभागृहात आयोजित उद्योजक, व्यावसायिक, व्यापारी आणि नागरिकांच्या प्रमुख २६ संघटनांच्या संयुक्त बैठकीत देण्यात आला. वाहतुकीच्या मार्गात अडथळे ठरणारे अतिक्रमण काढावेत, हवाई सेवेचे व्यापक जाळे विणावे तसेच नाशिकहून मुंबईसाठी जलद रेल्वे सेवा सुरू करावी आदी बाबींसहीत नासिक जिल्ह्याच्या विकासाला पूरक अनेक मागण्यांवर विस्तृत चर्चा करण्यात आली.

व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे अध्यक्ष, क्रेडाईचे हितेश पोद्दार, नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य, निपमचे हेमंत राख, चेंबरचे कांतीलाल चोपडा, लघु उद्योग भारतीचे विवेक कुलकर्णी, निमाचे माजी अध्यक्ष विवेक गोगटे, तानचे सागर वाकचौरे, प्रॅक्टिशनर इंजिनियर असोसिएशनचे अनिल कडभाने आदींसह मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत नाशिक शहर तसेच जिल्ह्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत उपस्थित सर्व प्रतिनिधींच्या भावना खूप तीव्र दिसल्या. टोल भरल्यानंतरही त्या तुलनेने रस्ते चांगले नसतील तर त्याचा उपयोग काय? मुंबईला जायला जर आठ-आठ तास लागत असतील तर ते आम्ही कसे खपवून घ्यायचे? असा संतप्त सवाल करून रस्त्यांची डागडुजी लवकर न झाल्यास शासनाने स्वतःहून या मार्गांवरील टोल बंद करावे असा एकमुखी निर्णयही बैठकीत घेण्यात आला. वंदे भारत आणि जनशताब्दीच्या धर्तीवर नाशिकहून मुंबईला तीन तासात पोहोचवणारी जलद रेल्वे हवी, नाशिकहून मुंबईसाठी लोकल सेवेचे व्यापक जाळे विणले जावे, नाशिकला कोकणशी जोडण्यास औरंगाबाद-मडगाव रेल्वे सुरू करावी, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित केलेल्या बाह्य रिंगरोडला त्वरित मंजुरी मिळावी, महापालिकेच्या बंद असलेल्या सर्व जकात नाक्यांजवळ ट्रक टर्मिनस उभारावे, नाशिकहून आणखी विविध ठिकाणी विमान सेवा सुरू करावी, शहर तसेच जिल्ह्यातील कोलमडलेल्या वाहतूक व्यवस्थेवर उपाय शोधण्यास तसेच त्याला शिस्त लावण्यास सर्वांनी संयुक्त प्रयत्न करावेत, वाहतुकीची कोंडी कमी करण्यास सार्वजनिक वाहतूक सेवेवर सर्वांनीच भर द्यावा, नाशिक हे लॉजिस्टिकचे राष्ट्रीय हब व्हावे अशी सूचना केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. त्याचा गांभीर्याने विचार व्हावा, शिंदे-पळसे टोल नाक्यावर मनुष्यबळ वाढवावे, सीबीएससीसहित इतर काही रस्त्यावर राईट टर्न सुरू करावा. नासिक मुंबई महामार्गावर त्यांना अनधिकृत कट निर्माण झाले असून ते बंद करावेत. मुंबईला जाणारा जो विलंब आहे तो टळेल, ओझर विमानतळावरून सर्व ठिकाणी जाण्यास बस कनेक्टिव्हिटी हवी, नवीन नाशिकसाठी आणखी एक रेल्वे स्टेशन मुंबई रस्त्यावरील पाडळी येथे हवे, नाशिक ते वडपा हा रेल्वे मार्ग तयार व्हावा, घरगुती गॅस पाईपलाईनसाठी खोदून ठेवलेल्या रस्त्यांमुळे वाहतुकीला जो त्रास होतो आणि पावसाळ्यात हे रस्ते चिखलमय होतात. हे लक्षात घेऊन हे सर्व रस्ते त्वरित दुरुस्त करावेत, नाशिक येथे आयआयटी आणि आयएएम महाविद्यालये सुरू व्हावीत, अंबडचा कचरा डेपो अन्यत्र हलवावा किंवा तो बंदिस्त करून परिसरात दुर्गंधी पसरणार नाही याची काळजी घ्यावी. नागरिकांच्या सनदच्या धर्तीवर उद्योजकांची सनद तयार करावी ही मागणी मंजूर झाली. त्याची त्वरित अंमलबजावणी व्हावी आदी महत्वपूर्ण सूचना बैठकीत करण्यात आल्या.

उद्योजक आणि व्यापाऱ्यांच्या विविध मागण्यांच्या पाठपुरावासाठी सातत्याने बैठका घेण्याचे तसेच दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी सर्व संघटनांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेण्याचा निर्णयही यावेळी झाला. बैठकीस निमाचे कोषाध्यक्ष विरल ठक्कर, राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, कैलास पाटील, नरेश पारख, गिरीश नवसे, नंदन दीक्षित, सचिन पाटील, सचिन बागड, हितेश पोद्दार, मनोज वासवानी, आनंद सूर्यवंशी, राजेंद्र फड, संजय सोनवणे, अमित अलई, मनीष रावल, किरण वाजे, गोविंद झा, दिलीप वाघ, सुधाकर जाधव, सागर देवरे, श्रीकांत पाटील, सुभाष जांगडा, निखिल तापडिया, संजय राठी, वैभव चावक, सतीश कोठारी यांच्यासह नाईस, निपम, निवेक, लघुउद्योग भारती, तान, ट्रान्सपोर्ट असोसिएशन, सराफ असोसिएशन, निर्यातदार संघटना आदींसहित नाशिक मधील सर्व प्रमुख २६ संस्था आणि संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.पाटीलांच्या प्रयत्नाने वलवाडीत रस्त्यांसाठी ५०० लक्ष रु.चा निधी मंजूर

### रस्ते कामात विविध कॉलन्यांचा समावेश

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने मतदारसंघातील वलवाडी येथील विविध कॉलन्यांच्या रस्त्यांसाठी एकूण ५०० लक्ष रुपयांचा निधी मंजुर करण्यात आला आहे. या निधीतून कॉलन्यांमधील रस्त्यांचे डांबरीकरण आणि काही ठिकाणी गटांरीची कामे करण्यात येणार असल्याची माहिती आ.कुणाल पाटील यांनी दिली आहे.

धुळे ग्रामीण मतदारसंघातील गावांचा विकास व्हावा,येथील रहिवाशांच्या समस्या सुटाव्यात म्हणून आ.कुणाल पाटील हे नेहमीच शासनाच्या विविध पातळ्यांवर पाठपुरावा करुन प्रश्न मार्गी लावण्याच काम करीत असतात. धुळे महानगरपालिकेत ग्रामीण मतदारसंघातील अकरा गावांचा समावेश झाल्याने त्यांचाही विकास व्हावा म्हणून आ.पाटील हे प्रयत्नरत असतात. नुकताच आ.कुणाल पाटील यांनी वलवाडीतील विविध कॉलन्यांकरीता तब्बल ५०० लक्ष रुपयांचा निधी मंजुर करुन आणला आहे. प्रभाग क्र.१ वलवाडी येथील ओम नगर सर्व्हे नं.२०मधील कॉलनी अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे(६० लक्ष रु.),प्रभाग क्र. बिजली नगर सर्व्हे नं.३४/२ दिलीप पाटील यांच्या घरापासून ते पौर्णिमा नगरमधील प्रभाकर साळुंखे यांच्या घरापर्यंत ते पौर्णिमा नगरमधील हँण्ड पंपार्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण(१००लक्ष रु.), वलवाडी चंद्रकोर कॉलनी आर. एस.चव्हाण यांच्या घरापासून ते चंद्रकोर कॉलनी, शाकुंतल सोसायटीपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे(५०लक्ष रु.),वलवाडी प्रशांत नगर के.बी. पाटील यांच्या घरापासून ते चंद्रवेल फेज ३पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे(५०लक्ष रु.), प्रभाग ६ मधील वलवाडी येथील मोरया गृहनिर्माण सोसायटी बोर्डजवळील गजानन महाराज मंदिर ते ज्ञानदिप कॉलनीतील चंद्रमा सोसायटी ते वलवाडी-नकाणे रोडवरील निलेश राजपूत यांच्या दुकानापर्यंत शिवनेरी कॉलनी संतोष नगर बोर्डाकडून कुवर मिस्तरी यांच्या घरापर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे(७०लक्ष रु.),प्रभाग क्र.१ वलवाडी शिवप्रसाद कॉलनी महेंद्र अहिरराव यांच्या घरापासून ते इंद्रप्रस्थ कॉलनी ते राजेंद्र नगरमधील सचिन महाले यांच्या घरापर्यंत स्कायटेक अ‍ॅक्वापर्यंत रस्ता(८५ लक्ष रु.),प्रभाग क्र.१ वलवाडी धनदाई नगर श्रीराम चिल्ड्रन हॉस्पीटलपासून बोरसे नगर गणेश मंदिरापर्यंत ते पेट्रोल पंपापर्यंत रस्ता ते विद्युत प्रभा सोसायटी-सुर्योदय कॉलनी बोर्डपासून मोरे आण्णा यांच्या घरापर्यंत रस्ता(८५ लक्ष रु.) असे एकूण ५०० लक्ष रुपये मंजुर करण्यात आले आहेत. वलवाडीतील रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाल्याने रस्ते विकासाचा मार्ग मोकाळा झाला आहे.

# सैनिकी विद्यालयाच्या तीन माजी विद्यार्थ्यांनी मिळविले स्पर्धा परीक्षेत यश

**धुळे । प्रतिनिधी**







मोराणे प्र. नेर येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान बोरकुंड संचलित श्री.छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालयाच्या तीन माजी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ )परीक्षेत घवघवीत यश संपादित केले. विद्यालयाचे दोन विद्यार्थी पोलीस उपनिरीक्षक तर एक विद्यार्थी नगररचना अधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याने विद्यालयाच्या शिरपेचात अजुन एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. यापूर्वीही या विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी पोलीस विभागासह विविध विभागाच्या वरिष्ठ पदापर्यंत मजल मारली असुन, अनेक माजी विद्यार्थी उच्चपदस्थ अधिकारी पदावर कार्यरत आहेत.

यात मोराणे प्र.नेर येथील सैनिकी विद्यालयाचा माजी विद्यार्थी तुषार भाईदास अहिरे यांची राजपत्रित अधिकारी वर्ग २ या अंतर्गत नगर रचना विभाग महाराष्ट्र शासन या पदी निवड झाली आहे. त्यांनी अनुसूचित जमाती प्रवर्गातून महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळविला. तुषार अहिरे यांचे इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण श्री. छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय मोराणे प्र.नेर येथून पूर्ण झालेले आहे. त्यांचा लहान भाऊ व बहीण यांनी देखील आपले शिक्षण सैनिकी विद्यालयातूनच घेतले आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेतही शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी यशाचा झेंडा रोवला आहे. शाळेचा माजी विद्यार्थी मास्टर रोहित नानासाहेब जाधव यांनी पहिल्याच प्रयत्नात पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली. त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षण सैनिकी विद्यालयातून पूर्ण केले आहे. तसेच शाळेचा माजी विद्यार्थी कैलास पावरा यांनीही पहिल्याच प्रयत्नात पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादित केले. विद्यालयाच्या या माजी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, सचिव तथा जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

### कैलास ताणकर मोटिवेशनल शो चे बहारदार आयोजन

**पिंपळनेर ।** येथील महात्मा फुले विद्या प्रसारक संस्था पिंपळनेर तर्फे सेवा निवृत्ती डी वाय एस पी कैलाश ताण कर यांचा विद्यार्थी व नागरिकांसाठी मोटीवेशनल शो चे आयोजन दाजी साठे मेमेरिअल इंग्लिश मीडियम स्कूल सामोडे पगारे आश्रम शाळा संकुल येथे संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी कैलाश ताण कर व मान्यवरांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष संभाजी पगारे, संचालक व्ही एन जिरे पाटील, स्वप्निल पगारे, व्ही बी सोनवणे, पुष्पलता संभाजी पगारे, छाया पगारे,मिलिंद महाजन,रावसाहेब मोहन सूर्यवंशी, विठ्ठलराव पगारे, साहेबराव नंदन, साहेबराव क्षिरसागर, अशोक पाटील, ललित साळवे, सुरेश सासले, संध्या सासले, भोंगे साहेब, अण्णा नेरकर, श्रीराम जाधव, प्रा डी टी पाटील, गजानन साळवे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमात विविध गीत, क्लासिकल डान्स, नाटिका याद्वारे पूर्ण संचातील कलाकारांनी आपल्या कला सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी परिसरातील नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी वि ज भ ज आश्रम शाळा,आदिवशी आश्रम शाळा सामोडे व मैदाने येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले .पिंपळनेर परिसरातील आजपर्यंत च्या इतिहासातील एकमेव मोटीवेशनल शो चे आयोजन आदिवासी विश्व दिन व क्रांती दिनाच्या निमित्ताने संभाजी पगारे यांनी घडवून आणला त्याबद्दल त्यांचे परिसरातून कौतुक होते आहे.

# भररस्त्यात वीस फूट खोल खड्डा : विद्यार्थी आणि रहिवाशांचा जीव धोक्यात

**धुळे । प्रतिनिधी**



शहरातील केंद्रीय विद्यालयाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर चक्क २० फुट खोल तलाव ठेकेदाराने करण्याचा चमत्कार घडविला आहे. त्याच्या या चमत्कारामुळे विद्यार्थी आणि रहिवाशाचा जीव धोक्यात आला आहे. गुजरातचा हा ठेकेदार भारतीय जनता पक्षाचा जावई आहे का? असा सवाल धुळ्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने उपस्थित केला आहे.

केंद्रीय विद्यालयाकडे जाणाऱ्या ओसवाल नगर भागातील देवपूरात असलेल्या प्रमुख रस्ता मागील सुमारे चार महिन्यांपासून भूमिगत गटार योजनेच्या नावाने खोदून ठेवलेला आहे. ओसवाल नगर भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी नैसर्गिक छोटे नाले आहेत. या प्रमुख बाबीकडे दुर्लक्ष करून भूमिगत गटार योजनेत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्याच्या हेतूने, उंच अथवा डोंगराच्या भागाकडे म्हणजेच उलट्या दिशेने खडक फोडण्याच्या नावाने मागील चार महिन्यांपासून सुमारे वीस फुटापेक्षा जास्त खोल, सुमारे ५० फूट लांबीचा तसेच पंधरा फूट रुंदीचा मुख्य रस्त्यात मोठा खड्डा खोदून ठेवलेला आहे.

सर्वसाधारण खड्डा खोदण्यासाठी येणारा खर्चापेक्षा सुमारे सहा ते सात पटीने जास्त पैसे खडक फोडण्याच्या नावाने घेता येतात. तसेच फुगीर मेजरमेंट दाखवून कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करता येतो. याच एकमेव गैर हेतूने नागरिकांना त्रास होत असताना देखील सदर बेकायदेशीर आणि नियमबाह्य काम रेटून नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. यामुळे केंद्रीय विद्यालयाकडे जाणारा मुख्य रस्ता मागील तीन-चार महिन्यांपासून बंद आहे. याबाबत नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्यानंतर देखील या तक्रारींकडे ठेकेदार आणि प्रशासनाकडून कोणतीही दाखल घेण्यात आलेली नाही. याबाबत स्थानिक नागरिकांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे तक्रारी दिल्यानंतर सुमारे आठ दिवसांपूर्वी शिवसेना विधानसभा संघटक ललित माळी यांनी सदरचे काम त्वरित पूर्ण करण्यासंदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांना कळविले होते. तसेच सदर काम त्वरित पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिलेला होता. परंतु त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याचे चित्र सध्या बघायला मिळत आहे. सदर कृत्रिम खड्ड्यांमध्ये शाळकरी विद्यार्थी किंवा जेष्ठ नागरिक पडून मृत्यू होण्याची दाट शक्यता आहे. तसेच या खड्ड्यांमध्ये असलेल्या पाण्यामुळे परिसरामध्ये इतर आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे धुळे मनपाने त्वरित हा खड्डा बुजवून सदर घटना टाळाव्यात. अन्यथा येणाऱ्या काळात धुळे मनपाला टाळे ठोकल्याशिवाय शिवसेना स्वस्थ बसणार नाही, असा इशारा यावेळी शिवसेनेच्या वतीने देण्यात आला.

# उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार

### सार्वजनिक गणेश मंडळांनी अर्ज सादर करण्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचे आवाहन

**धुळे । प्रतिनिधी**



शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत २०२३ च्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार असून या पुस्कारासाठी जिल्ह्यातील गणेश मंडळांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत वर्ष २०२३ मध्ये गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत राज्यातील पहिल्या तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळाना शासनाकडून प्रथम क्रमांक ५ लाख, द्वितीय क्रमांक २ लाख ५० हजार तर तृतीय क्रमांकास १ लाखाचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येईल. तसेच उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. यासाठी खालील निकषाच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल पर्यावरणपुरक मुर्ती, पर्यावरणपुरक सजावट,(थर्माकाल, प्लॅस्टीक इत्यादी साहित्य विरहीत) ध्वनी प्रदुषण रहित वातावरण, पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्वा निर्मुलन, स्वांतत्र्याच्या चळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळा इत्यादी समाज प्रबोधन व सामाजिक सलोखा असणारे कार्य. गणेश मंडळाने शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक इत्यादीबाबत केलेले कार्य, गणेशोत्सव मंडळाने घेतले जाणारे, पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, पांरपारिक देशी खेळाच्या स्पर्धा, गणेश भक्तासाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा (पाणी,प्रसाधनगृह, वैद्यकिय प्रथमोपचार, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे आयोजन, शिस्त, परिसरातील स्वच्छता आदी निकषानुसार गुणांकावर पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. स्पर्धेत भाग घेण्यासाठी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे ारहेीर्ीं. श्रिवरसारळश्र.लो या ई-मेल वर विहीत नमुन्यात ५ सप्टेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत. अर्जाचा नमूना शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ०४ जुलै,२०२३ च्या शासन निर्णयातील सोबतच्या परिशिष्ट अमध्ये देण्यात आला आहे. तसेच पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी कार्यपद्धत नमूद करण्यात आली आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तरी धुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था **Admission Open**

**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**

NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A

ज्ञानगंगा घरोघरी

B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.

प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





# पांझरा चौपाटीवरील उद्यान कामाची खासदारांनी केली पाहणी











धुळे । शहरासाठी प्रमुख आकर्षण ठरणार्या पांझरा चौपाटी येथील उद्यानाचे काम प्रगतीपथावर आहे. या उद्यानाचा लोकार्पण सोहळा लवकरच जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, माजीमंत्री जयकुमार रावल यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने हे उद्यान साकार असून हे धुळेकरांसाठी आनंददायी असल्याचे प्रतिपादन खा.डॉ.सुभाष भामरे यांनी केले.महापालिकेमार्फत शासनाच्या मूलभूत सेवा सुविधा निधी अंतर्गत सुमारे ५ कोटी व मनपा विकास निधी अंतर्गत सुमारे २ कोटी अशा एकूण सात कोटी निधीतून पांझरा नदीकिनारी असलेल्या चौपाटीवर प्रस्तावित उद्यानाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच हे उद्यान नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे. या प्रस्तावित उद्यानाची पाहणी काल सकाळी खा.डॉ.सुभाष भामरे तसेच महापौर प्रतिभा चौधरी, आयुक्त देविदास टेकाळे, भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महानगराध्यक्ष अनुप अग्रवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या निधी अंतर्गत उद्यानात खोदकाम करणे, कंपाउंड वॉल, जॉगिंग ट्रॅक, कारंजा, रिटेनिंग वॉल, बोरवेल, वृक्ष लागवड,भुलभुलैय्या प्लांटेशन उद्यानात विद्युत व्यवस्था आदी कामे घेण्यात आलेली होती. या नुतन उद्यानाचे वैशिष्ट्य म्हणजे खानदेशातील एकमेव लेझर शो या ठिकाणी बसविण्यात आला आहे. त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी व बैठक व्यवस्था पूर्णत्वास आली आहे. सुमारे साडेतीन ते चार एकर परिसरात साकार होणारे हे उद्यान धुळे शहरातील आबाल वृद्धांसाठी आकर्षण राहणार आहे.

संकलन : सचिन बागुल

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# राष्ट्रवादी काँग्रेस, महात्मा फुले समता परिषदेतर्फे मनोहर भिडे यांच्या विरोधात आंदोलन












नाशिक । राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने मनोहर भिडे यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण मंत्री छगन भुजबळ व माजी खासदार समीर भुजबळ यांच्या सुचनेनुसार काल दि. ३१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर यावेळी उपजिल्हाधिकारी पारध्ये यांना निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदनात म्हटले की, महात्मा गांधी हे भारताचे राष्ट्रपिता असून त्यांच्या बद्दल अपशब्द वापरणे हा देशद्रोहाचा गुन्हा ठरतो. मनोहर भिडेंनी महात्मा गांधी यांच्याबाबत अत्यंत निंदा नालस्ती करणारे विधान केल्याने समाजात तेढ निर्माण करणाऱ्या संभाजी भिडेंना अटक करावी. समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करण्याचा त्यांनी यापुर्वीही प्रयत्न केला आहे. संभाजी भिडे हे प्रत्येक वेळी अनेक महापुरुषांबद्दल अपशब्द वापरून तरुणांची माथे भडकावून दिशाभूल करत आहे असा आरोप करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून भिडे अशी चिथावणीखोर वक्तव्ये करत आहेत. भिडे जातीवाचक वक्तव्य करत असल्याने दोन समाजात जातीय तेढ निर्माण होऊन दंगली घडू शकतात. जगात ख्याती असणाऱ्या राष्ट्रपित्याबद्दल अशी वक्तव्ये करणाऱ्या मनोहर भिडें विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून समाजात तेढ निर्माण करून दंगलीचे बीज पेरणाऱ्या भिडेंना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.